जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३९७ दिनांक - २६/०९/२०२४**

गुन्हे शाखा पुणे शहर

## पोर्शे कार अपघातातील विधीसंघर्षित बालकाविरुद्धचा पुरवणी अहवाल मा.बाल न्याय मंडळात सादर

येरवडा पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ३०६/२०२४, भादवि कलम ३०४,२७९,३३८,३३७, ४२७,१२०(ब),२०१,मोटार वाहन कायदा कलम १८४,१८५,११९/१७७ प्रमाणे या गुन्ह्यातील विधीसंघर्षित बालकाचे विरूध्द अंतिम अहवाल दिनांक १५/६/२०२४ रोजी मा.बाल न्याय मंडळात सादर करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३(८) प्रमाणे केले तपासात गुन्ह्यातीलविधी संघर्षित बालकाने आरोपी विशाल सुरेंद्रकुमार अगरवाल व आरोपी शिवानी विशाल अगरवाल यांचेसह ससुन हॉस्पीटल, वॉर्ड नं.४० मधील सी.एम.ओ. आरोपी डॉ.श्रीहरी हाळनोर यांना आरोपी अमर गायकवाड व आशपाक मकानदार यांचे मार्फतीने लाचेच्या स्वरूपात आर्थिक प्रलोभन देऊन ससुन हॉस्पीटल अधिष्ठाता आरोपी अजय तावरे याचे सांगणेवरून सदोष मनुष्यवधाचे गुन्हयातील महत्त्वपुर्ण पुरावा स्वतःचे रक्त बदलुन त्याचे ऐवजी आरोपी शिवानी अगरवाल हिचा रक्त नमुना घेण्यास आरोपी श्रीहरी हाळनोर यास तो सीलबंद करून ससुन हॉस्पीटल येथील रजिस्टर तसेच तपासणी फॉर्मचे बनावटीकरण करण्यास भाग पाडण्याचे कृत्यात सहभागी होवून तो अहवाल तपासणी करीता मा.न्याय सहायक रासायनिक प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविण्याचा तसेच स्वतःचा रक्त नमुना नष्ट करण्याच्या उद्देशाने वर नमुद आरोपी यांचेसह संगणमताने फौजदारी पात्र कट रचुन तो पुर्णत्वास नेऊन ससुन हॉस्पीटल येथील चतुर्थ श्रेणी कर्मचारी आरोपी अतुल घटकांबळे याचे करवी ठरलेली ३ लाख रूपये लाचेची रक्कम आरोपी श्रीहरी हाळनोर याने स्विकारल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने विधी संघर्षित बालका विरुद्ध भादवि कलम ३०४,२७९,३३८,३३७,४२७,१२०(ब),२०१,२१३,२१४, ४६६,४६७,४६८,४७१,१०९,३४ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ कलम ७,७ (अ),८,१२, १३ मोटार वाहन कायदा कलम १८४,१८५,११९/१७७ ३(१)/१८०,५(१)/१८१,१९९(अ) प्रमाणे पुरवणी अहवाल मा.बाल न्याय मंडळ, येरवडा, पुणे येथे दिनांक २५/९/२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे.

तसेच बाल न्याय मंडळ,पुणे यांचेसमोर विधीसंघर्षित बालक संदर्भातील अर्जाची सुनावणीची पुढील तारीख दिनांक ०४/१०/२०२४ रोजी आहे.